रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

Rambhau Mhalgi Prabodhini

# वक्तृत्वकला आणि संवादकौशलये प्रशिक्षण शिबिर

## दि. २५-२६ फेब्रुवारी, २०१७

---

### -: कार्यक्रम अहवाल :-

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने **दि. २५-२६ फेब्रुवारी, २०१७** या कालावधीत **'वक्तृत्वकला आणि संवादकौशल्ये'** या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर योजण्यात आले होते. गेली २३ वर्षे अनेक मान्यवर या शिबिराद्वारे मार्गदर्शन करीत आले आहेत.

यंदा या प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्राच्या १० जिल्हयांतून ३८ पुरुष आणि ८ महिला असे एकूण ४६ प्रतिनिधी सहभागी झाले होते.




उद्घाटन सत्रात मार्गदर्शन करतांना श्री. मिलिंद बल्लाळ



प्रशिक्षण शिबिरात उपस्थित सहभागी

या प्रशिक्षण शिबिराचे प्रास्ताविक प्रबोधिनीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी मिलिंद चाळके यांनी केले. तर 'उद्घाटन' 'ठाणे वैभव' या दैनिकाचे संपादक **मिलिंद बल्लाळ** यांनी केले. वक्तृत्व हे अर्थपूर्ण विचारांनी प्रस्तुत केले तर ते प्रभावी ठरते, त्यासाठी विचार, भावना, जिज्ञासा आणि कळकळ या चतुसुत्रीचा वक्तत्याने अंगीकार करायला हवा हे त्यांनी सहभागींना सांगितले.

वक्तृत्व कलेत वाचनाचे महत्व आहेच, एखाद्या विषयावरचे भाषण तयार करण्यापूर्वी काय वाचावे? ते कसे वाचावे याच बरोबर माणसं वाचायला शिकले पाहिजे. व आपला व्यासंग जपला पाहिजे. या मुद्यांना स्पर्श करत **'वाचन आणि व्यासंग'** या विषयाचे सत्र दै. लोकसत्ताचे वरिष्ठ सहसंपादक **दिनेश गुणे** यांनी साकारले.



सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. दिनेश गुणे




सहभागींना मार्गदर्शन करतांना डॉ. रामदास गुजराथी

मुंबई ग्राहक पंचायतचे अध्यक्ष आणि निवृत्त प्राचार्य **डॉ. रामदास गुजराथी** यांनी **'संवाद कौशल्ये'** या विषयाची मांडणी केली. संवादाची नेमकी प्रक्रिया कशी घडते. त्यातला नेमकेपणा, येणारे अडथळे, तसेच चांगला वक्ता होण्याआधी चांगला श्रोता होता आले पाहिजे, अशा विविध मुद्यांना स्पर्श करत त्यांनी हा विषय प्रभावीपणे मांडला.

संवाद कौशल्यात देहबोलीला अनन्य साधारण महत्व आहे. कुणाशीही संवाद साधताना, चेहऱ्यावरील हावभाव, हाता-पायांची हालचाल यातून प्रभावी संवाद कसा साधावा. तसेच कोणत्या प्रसंगाला कोणते कपडे परिधान करावे याचे मार्गदर्शन **'देहबोली'** या विषयावरील सत्रात **डॉ. स्वप्ना पाटकर** यांनी सहभागींना केले.



**सहभागींना मार्गदर्शन करतांना डॉ. स्वप्ना पाटकर**



**सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. प्रमोद पवार**

ज्येष्ठ रंगकर्मी **प्रमोद पवार** यांनी **'उच्चारशास्त्र व आवाजाची जोपासना'** या विषयावर मार्गदर्शन केले. मूळ आवाज कसा ही असला तरी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास तो आवाज योग्य स्तरावर आणता येतो, त्यासाठी श्वासाचे व जिव्हेचे व्यायाम त्यांनी सहभागींना शिकविले.

वक्तृत्व कलेतील **'भाषण कसे करावे'** या विषयावरील सत्र माध्यम सल्लागार, स्तंभ लेखक आणि व्यावसायिक **मंदार भारदे** यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर, ध्वनी क्षेपकासमोर कसे उभे रहावे. शब्द फेक, उदाहरणे, प्रसंगानुरुप संदर्भ असलेले भाषण नेमके कसे रंजकतेने मांडता येईल. त्याचे महत्व त्यांनी सांगितले. तर **'भाषणकला'** या विषयावरील दुसऱ्या सत्रात त्यांनी भाषण कलेचे महत्वाचे घटक विषद करताना विषय, शब्द रचना, देहबोली आणि आवाजाचा चढउतार आणि या सगळ्यातून साधावयाचा परिणाम त्यांनी मार्मिकपणे सहभागींना शिकवला.



**सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. मंदार भारदे**

त्यांनी काही सहभागींकडून प्रात्यक्षिके करुन घेत, दृकश्राव्य चित्रीकरण करुन त्यांच्या त्रुटी व त्यांची मर्मस्थळे दाखवून दिली. हे सत्र फारच उपयुक्त ठरल्याची भावना सहभागींनी व्यक्त केली.



**सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. राजेंद्र पाटणकर**

**'निवेदन आणि सूत्रसंचालन'** या विषयाची मांडणी करताना आकशवाणी उद्घोषक व ज्येष्ठ सूत्रसंचालक **राजेंद्र पाटणकर** यांनी दोन्ही कामातला मूलभूत फरक समजावून सांगितला. सूत्रसंचालकाकडे भरपूर वाचन, प्रसंगावधान, हजरजबाबीपणा या गुणांची आवश्कता हवी हे पटवून दिले. कोणत्याही कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किंवा निवेदन करताना त्या कार्यक्रमाची आधी नीट माहिती घेऊन, तयारी केली तर काम सुलभ होते. हे त्यांनी स्वानुभवावरुन सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक **अजय अंबेकर** 'समारोप' सत्राचे प्रमुख पाहुणे होते. समारोप सत्रात वक्तृत्वकला व भाषण यांत पाळावयाची पथ्ये व विविध पैलूंवर त्यांनी पी.पी.टी. द्वारे सहभागींना मार्गदर्शन केले. त्यांच्या हस्ते सहभागींना प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. या प्रसंगी काही सहभागींनी आपले मनोगत व्यक्त केले व प्रबोधिनीच्या या उपक्रमाची प्रशंसा केली. आभार प्रदर्शनाने व वंदे मातरम् ने प्रशिक्षण शिबिराची सांगता झाली.



**सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. अजय अंबेकर**





**सहभागींना प्रमाणपत्र देतांना श्री. अजय अंबेकर**



**प्रशिक्षण शिबिरात उपस्थित सहभागी**